# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापूर **P.S.(ठाणे):** कोडोली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0145 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**26/05/2025 15:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 07/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/04/2025
**Time From (वेळेपासून):** 16:43 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/05/2025 **Time (वेळ):** 14:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 015

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/05/2025 14:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सजा वाडीरत्नागीरी,पन्हाळा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** वैभव कष्णात चौगले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कसबा बावडा,करवीर ,शहापूर पोलीस स्टेशन,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कसबा बावडा,करवीर ,शहापूर पोलीस स्टेशन,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8308656767

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश मुरलीधर वळीवडेकर | | वडील का नाम : मुरलीधर वळीवडेकर | 1. प्लट नबर 56 ब लघुवेतन कलनी,उजळाईवाडी,करवीर,, गोकुळ-शिरगांव,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** **UIDB Number**
(अ.क्र.) (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दिनांक - 26/05/2025

मी वैभव कृष्णात चौगले, वय - 27 वर्षे, व्यवसाय - व्यापार, रा.कसबा बावडा, कोल्हापुर, ता.करवीर जिल्हा कोल्हापुर मो.नं.8308656767 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 07/04/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांना समक्ष भेटुन, माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितली की, मी वरील गावचा रहिवाशी असुन, माझी शेती गट नं.4 मौजे गिरोली ता.पन्हाळा जि.कोल्हापुर येथे असुन सदर शेतात बोअरवेल मारायची आहे. बोर मारण्याची गाडी जड असल्याने ती रूतु नये म्हणुन, शेतात जाणेकरीता शेतीच्या बाजुला गायरान रस्ता व्यवस्थीत नसल्याने, तात्पुरता रस्ता करण्याकरीता दि.06/04/2025 रोजी माझे परिचयाचे ओमकार पाटील यांचे जेसीबीने खडी पसरवत असताना, त्याठिकाणी गिरोली गावचे पोलीस पाटील मोहन कदम व तलाठी वळीवडेकर हे आले, या कामाकरीता परवानगी घेतली आहे काय? व परवानगी न घेता कसे काय काम करता असे बोलुन,सदर ठिकाणचा पंचनामा करून ओमकार पाटील यांचा जेसीबी त्यांनी ताब्यात घेतला व तलाठी वळीवडेकर यांनी कारवाई करायची नसेल तर 50,000/-रूपये दयावे लागतील असे सांगीतले. तेंव्हा त्यांना आम्ही नंतर येवुन भेटतो असे सांगितले. दि.07/04/2025 रोजी 11.00 वा.सुमारास तलाठी कार्यालय सजा ज्योतिबा याठिकाणी जावुन तलाठी वळीवडेकर यांना भेटलो असता,त्यांनी पैसे आणले काय? याबावत विचारणा करून पैसे दिल्यानंतरच जेसीबी सोडणार असे सांगितले. गिरोली गावचे तलाठी हे माझेकडे मागणी करत असलेले 50,000/- रूपये हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाल्याने आम्ही त्यांना पैशाची जुळणा करून भेटतो असे सांगितले होते. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी ही तक्रार सांगुन मी तलाठी वळीवडेकर यांना दि. 07/04/2025 रोजी वाडीरत्नागीरी ज्योतीबा येथे त्यांच्या कार्यालयामध्ये भेटण्यास जाणार असलेचे सांगितल होते. त्यावेळी पाटील मॅडम यांनी पोलीस निरीक्षक बापु साळुंके यांना बोलावुन घेवुन ते पुढील कारवाई करतील असे सांगितले. त्यावेळी मी साळुंके साहेबांना माझी वरील तक्रार सांगितली. त्यानंतर साळुंके साहेबांनी लागलीच दोन शासकीय पंच बोलावुन घेतले व त्यांनी माझी शासकीय दोन्ही पंच, स्टाफ यांची ओळख करून दिली त्यांचे सुचनेवरून पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगितली.

त्यानंतर साहेबांनी आम्हाला पुढील कारवाई वाडीरत्नागिरी ज्योतीबा येथे आलीकडे जावुन करण्याची असल्याचे सांगितले. साळुंके साहेब शासकिय बोलेरो गाडी व मी माझी महिंद्रा थार गाडीमधुन एसीबी कार्यालय येथुन दुपारी 3.45 वा. निघुन सर्वजण ज्योतीबा येथे अलीकडे नविन एसटी स्टॅन्डचे बाजुस असले वर्दळ नसलेल्या एका रिकाम्या जागी सायंकाळी 4.25 वा. थांबलो. साळुंके साहेबांनी मला त्यांचेकडील शासकिय गाडीमध्ये बसण्यास सांगुन त्यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन तलाठी वळीवडेकर हे माझेकडे लाचेची मागणी करतात काय? याची प्रथम पडताळणी करणार असल्याचे सांगुन, आम्हाला पडताळणी कारवाईचे अनुशंगाने आवश्यक सुचना देवुन त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड घालुन, त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाषण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करून दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 4.43 वाजता चालु करून तो माझ्या गळयात दो-याचे सहायाने अडकवुन मला व पंच नं.1 दिंगबर पाटील यांना माझेकडील महिंद्रा थार गाडी नंबर23 ठभ् . 7164 स् मधुन,वाडीरत्नागीरी तलाठी कार्यालय येथे पाठवुन दिले. आम्ही वाडी रत्नागिरी तलाठी कार्यालय येथे जावुन रोडचे कडेला गाडी पार्क केली. त्यानंतर आम्ही दोघे तलाठी कार्यालयाचे समोर गेलो तेथे गर्दी होती व मिटींग चालु असल्याचे समजले. त्यावेळी कोतवाल बाहेर आल्या असता, त्यांना मी वळीवडेकर साहेबांना बोलविण्यास सांगितले ते आतमध्ये गेलेनंतर, वळीवडेकर हे फोनवर बोलत बाहेर आले. त्यांना मी बाजुला बोलावुन घेतले व जेसीबीवाला सारखे सारखे फोन करीत असल्याचे सांगितले. त्यावेळी आम्ही बोलत तलाठी कार्यालयाचे एका रूममध्ये पंचासह गेलो. रूममध्ये जात असताना वळीवडेकर यांनी

अचानक मिटींग लागल्याने प्रांत साहेब आल्याचे सांगितले. आम्ही एका रूममध्ये गेलो,तेथे मी वळीवडेकर यांना " काय करायचे ते सांगा", " पैश्याचं एवढं जास्त होत्यात" असे म्हणालो. त्यावेळी वळीवडेकर "काय सांगा तुम्ही, मी बोललोय ना " असे म्हणाले. त्यावेळी मी " पैसे लय होत्यात तेवढे" असे म्हणालो. त्यावेळी वळीवडेकर यांनी " दे, तुमचं की" असे म्हणाले. त्यावेळी मी "काय ते तुम्ही सांगा" असे म्हणालो. त्यावेळी वळीवडेकर यांनी "तुम्ही सांगा तुमच्या हेनं.." असे म्हणाले. त्यावेळी मी " पैसे घेवुन आलोय कुठं, कुणाकडे दयायचे सांगा, मी देवुन जातो, जेसीबी तेवढा सोडा बिचा-याचा,मला लय फोन करायला लागलाय "असे म्हणालो व "जेसीबी मालक पाच हजार रूपये देतो म्हणायलाय, वरचे मला घालायला पाहीजे" असे म्हणालो. त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी वळीवडेकर यांनी " मगाशी सांगितलं तुम्हाला.." असे म्हणाले. त्यावेळी मी " लय होत्यात साहेब.." असे म्हणुन "जेसीबी मालक पाच हजार देणार आहे वरचं मला घालावे लागणार आहे असे म्हणुन, "किती सांगा..." असे विचारून "जेसीबी तेवढा सोडा..." असे म्हणालो. त्यावेळी वळीवडेकर यांनी "काय सांगायचं आता, साहेबांचा आणि सांगायचं... साहेबांना आणि पाठवायचा आमच्यकडच.." असे म्हणुन त्यांनी मला त्यांचे मोबाईलचे कॅलक्युलेटरवर 30 असा अंक टाईप करून माझे समोर धरला. त्यावेळी मी त्यांचे हातातील मोबाईलमध्ये बघुन " तीस हजार..., लय होत्यात साहेब, अॅडजेसमेन्टला आवघड होतय.. असे म्हणालो.त्यावेळी पंच नं.01 दिगंबर पाटील हा माझे सोबत होता व वरील घटना त्यानेही पाहीली आहे.त्यावेळी वळीवडेकर यांनी "काय आवघड होतय, मागच्या वेळी तुम्हाला पन्नास सांगितलेले..त्यावेळी तुम्ही गावला असता... असे म्हणुन "साहेब लय मोठा दंड करत्यात... परवाच्या एका हयात एकोणीस लाख रूपये दंड केला चलन भरूण आल्यात" असे म्हणाले. त्यावेळी मी " बर असुदे, ऐका काय विषय आहे, वीस मी म्हणलोय " असे म्हणुन " पंचवीस हजार पर्यत करूया.., ते पाच आणि वरचं वीस मला घालायला लागणार हाईत ,करा असुदे अॅडजेस्ट असे म्हणुन कुणाकडे दयायचे ? " असे विचारले. त्यावेळी वळीवडेकर यांनी " हीत आणुन दे" असे म्हणुन माझेकडे तडजोडी अंती 25000/-रूपयाची मागणी केली. मी "वीस आणल्यात, पाच हजार काढुन घेवुन येतो" असे कारण सांगुन रूममधुन बाहेर आलो. त्यानंतर आम्ही तेथुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी परत आलो व व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 5.05 वाजता बंद केला.त्यानंतर मी घडलेली हकीकत साळुंके साहेबांना सांगितली.

माझे शेतामध्ये जाणेसाठी असलेल्या गायरानातील रस्त्यामध्ये बोअरची गाडी जाणेसाठी, ओकांर पाटील यांचे जेसीबीच्या साहयाने खडी पसरत असताना, तलाठी वळीवडेकर यांनी जेसीबी जप्त केला होता तो जेसीबी सोडविण्याकरीता व पुढील कारवाई टाळेणेकरीता माझेकडे वळीवडेकर यांनी 30,000/-रू लाचेची मागणी केली, मी त्यांना 25000/-रू देतो असे म्हणालो असता, त्यांनी 25000/-रू आणुन देण्यास सांगुन तडजोडीअंती माझेकडे 25000/-रू लाच रक्कम मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच तलाठी वळीवडेकर यांनी सदर लाच रक्कमेतील पैसे हे वरिष्ठ अधिकारी यांना दयावे लागतात असे सांगितल्याने साळुंके साहेबांनी तलाठी वळीवडेकर हे कोणत्या वरीष्ठांकरीता पैशांची मागणी करीत आहेत, याकरीता त्यांचेकडे पुन्हा पडताळणी करण्याचे ठरविले. साळुंके साहेबांनी पुन्हा मला पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये असलेले मेमरी कार्ड मध्ये यापुर्वीची एक फाईल असल्याची खात्री करून दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सायकाळी 5.56 वाजता चालु करून, तो माझ्या गळ्यात अडकवुन मला व पंच नं.1 दिंगबर पाटील यांना माझे गाडीमधुन वाडीरत्नागीरी तलाठी कार्यालय येथे पाठवुन दिले. आम्ही तलाठी कार्यालयामध्ये गेलो तेथे वळीवडेकर साहेब नव्हते म्हणुन, मी कोतवाल महिलेला वळीवडेकर साहेबांच्याबाबत विचारले,त्यांनी साहेब मंदिराकडे गेल्याचे सांगितले. त्यानंतर मी माझे मोबाईल नंबर वरून तलाठी यांचा मोबाईल नंबर 9923827136 वर दोन ते तीन वेळा फोन केला असता, फोन बंद लागला. त्यानंतर बराचवेळ थांबुन मी तलाठी वळीवडेकर यायला किती वेळ लागेल याची चौकशी केली, त्यावेळी त्यांना अर्धा ते एक तास यायला लागेल असे समजले. त्यानंतर बराचवेळ थांबुन मी पुन्हा तलाठी वळीवडेकर यांचेबाबत चौकशी केली. ते घरात प्रॉब्लेम झाल्यामुळे गडबडीने निघुन गेल्याचे समजलेने,आम्ही तेथुन निघुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो व व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 7.33 वाजता बंद केला. मी घडलेली हकीकत साळुंके साहेबांना सांगितली. वळीवडेकर हे घरी गेल्याने त्यांचेकडे ते कोणत्या वरिष्ठांचेकरीता लाचेची मागणी करतात याची पडताळणी दिनांक 08/04/2025 रोजी करण्याची आहे असे सांगुन चालु कारवाई तात्पुरती स्थगीत केली.

दिनांक 08/04/2025 रोजी साळुंके साहेब व मी एकमेकाचे संपर्कात होतो. त्यांना मी केर्ली येथे नविन हायवेचे काम चालु असलेल्या ठिकाणी येण्यास सांगितले. थोडयावेळाने सकाळी 10.20 वा चे सुमारास साळुंके साहेब, स्टाफ व पंचासह तेथे आले, त्यांना मी तेथे जावुन भेटलो. त्यावेळी मी साळुंके साहेबांना तलाठी वळीवडेकर हे पन्हाळा तहसिलदार कार्यालयामध्ये गेल्याने ते दुपारी कार्यालयामध्ये येणार असल्याचे समजल्याचे सांगितले. त्यावेळी साहेबांनी मला वळीवडेकर यांना फोन करण्यास सांगितला. त्यावेळी मी माझे मोबाईल नंबर वरुन तलाठी वळीवडेकर यांचा मोबाईल नंबर 9923827136 यावर 10.34 वा. व त्यांनतर 10.35 वा. असे दोनवेळा फोन

केला. त्यावेळी तलाठी वळीवडेकर यांनी फोन उचलला नाही. आम्ही थांबलेले ठिकाण हे वर्दळीचे असल्याने, आम्ही सर्वजण वाघबीळ गिरोली रोडला असले मातोश्री लॉजिंगच्या बाजुस असले रिकामे जागेत जावुन थांबलो. त्यानंतर मी जेसीबीचे मालक ओंकार पाटील यांना तलाठी आले आहेत काय, याबाबत माहिती घेण्यास सांगितले असता ओकांरने तलाठी वळीवडेकर हे कार्यालयात असल्याचे सांगितले. साळुंके साहेबांनी तलाठी वळीवडेकर यांची पडताळणी करीता, मला पुन्हा सुचना देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये असले मेमरी कार्ड मध्ये यापुर्वीच्या दोन फाईल असल्याची खात्री करून दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर दुपारी 2.56 वाजता चालु करून, तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 दिंगबर पाटील यांना माझेकडील गाडीमधुन वाडीरत्नागीरी तलाठी कार्यालय येथे पाठवुन दिले. आम्ही तेथे तलाठी कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी तेथे वळीवडेकर हे खुर्चीमध्ये बसुन होते त्यांचे समोर गर्दि होती मी वळीवडेकर यांना काय झालं साहेब असे विचारले. त्यावेळी वळीवडेकर यांनी कशाचे असे विचारले. त्यावेळी वळीवडेकर यांनी "ते दिलं तहसिलला.." असे सांगितले. त्यावेळी मी वळीवडेकर यांना बाहेर बोलविले त्यावेळी वळीवडेकर यांनी बोला इथेच,असे सांगुन, आमचे काम तहसिलदार कार्यालय येथे जमा केलय सकाळी असे सांगितले. त्यावेळी मी पुढे कशाला पाठविलेसा " काल सगळा झालाय विषय आपला आणि परत काय गैरसमज झालाय" असे म्हणालो. त्यावेळी वळीवडेकर यांनी "त्याचा काय विषय नाही शिपुगडेना सांगुन आलोय, आतापर्यत जावुन आला असता,झालं असतं" असे म्हणाले. त्यावेळी मी "बघुया की साहेब आपलं काय? " असे विचारले. त्यावेळी वळीवडेकर यांनी "पुढे तयार केलय सगळं, जावा इथे थांबु नका" असे म्हणाले. त्यावेळी मी" पुढे कशाला पाठविलसा, आपलं ठरलं सगळ" असे म्हणालो. त्यावेळी वळीवडेकर यांनी "जावा जावा.." असे म्हणाले. त्यावेळी मी "मोबाईलवर दाखविलेले तीस देतो, काय प्रॉब्लेम नाही" असे म्हणालो. त्यावेळी वळीवडेकर यांनी " तहसिलला गेलय काम.. तेथे शिपुगडे यांना सांगुन आलोय, जावा थांबु नका " असे म्हणाले. त्यावेळी मी "दोन मिनीट बाहेर बोलुया साहेब, काहीतरी गैरसमज झालाय" असे म्हणालो. त्यावेळी वळीवडेकर यांनी "गैरसमजाचा विषय नाही"असे म्हणाले. त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी वळीवडेकर यांनी नाही, असे सांगुन पुन्हा तहसिलदार कार्यालय येथे जावुन शिपुगडे यांची भेट घेण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर दुपारी 3.17 वाजता बंद केला. त्यानंतर मी घडलेली हकीकत साळुंके साहेबांना यांना सांगितली. साळुंके साहेबांनी पंचाचेकडुन व माझेकडुन हकिकत ऐकुण डीजीटल व्हॉइस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले त्यावरून तलाठी वळीवडेकर यांना माझा संशय आल्याने ते माझेशी यापुर्वी त्यांनी मागणी केलेल्या लाचेचे अनुषंगाने काही बोलले नाहीत.

त्यानंतर मी साळुंके साहेब यांना सांगितले की वळीवडेकर यांनी मला पन्हाळा तहसिलदार कार्यालय येथे शिपुगडे यांना भेटा ते तुमचे काम करतील असे सांगितले आहे. त्यामुळे शिपुगडे यांचेकडे गेल्यावर ते पैश्याची मागणी करतील असे सांगितल्याने, साळुंके साहेबांनी शिपुगडे हे माझेकडे लाचेची मागणी करतात काय? याकरीता पडताळणी करण्याचे ठरविले. ती पडताळणी पन्हाळा येथुन करण्याचे ठरविले त्यावेळी मी ओंकार पाटील हे पन्हाळा येथे माझ्या सोबत येवु देत त्यांचा जेसीबी आहे,त्यांना सुध्दा शिपुगडे बोलवणार असे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजण पन्हाळा येथे एमएसईबी ऑफिसच्या पाठीमागील बाजुस, रिकामे जागेत जावुन थांबलो. साळुंके साहेबांनी शिपुगडे यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी अनुषंगाने सुचना देवुन, त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 4.36 वा. चालु करून, तो माझ्या गळयात अडकवुन मला,जेसीबी मालक ओंकार पाटील व पंच नं. 1 दिंगबर पाटील यांना माझेकडील महिंद्रा थार गाडी मधुन तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथे पाठवुन दिले. आम्ही तहसिलदार कार्यालय येथे शिपुगडे यांना भेटलो. शिपुगडे यांना मी गिरोलीच्या तलाठी साहेबांनी पाठविल्याचे सांगितले. आमचेत माझे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी शिपुगडे यांना "कधी येणार मॅडम" असे विचारले. त्यावेळी शिपुगडे यांनी "थांबा थोडावेळ सहया घेवुन येतो" असे म्हणुन तेथुन निघुन गेले. त्यानंतर मी व ओकांर तहसिलदार शिंदे मॅडम यांना जावुन भेटलो त्यावेळी आम्ही त्यांना जेसीबी जप्त केला बाबत सांगितले तेंव्हा त्यांनी विदाउट परमिशन काम कसे केले तसेच परवानगी न घेता शेतामध्ये उत्खनन कसे केले तुम्हाला तुमच्या गाडया नेहताना कळायला पाहिजे असे वगैरे म्हणाल्या. त्यानंतर आम्हास जाणेस सांगितले. त्यानंतर आम्ही बाहेर येवुन शिपुगडे यांना पाहीले असता ते कोठे भेटले नाहीत. त्यानंतर त्यांची थोडावेळ वाट पाहुन आम्ही सर्वजन तेथुन निघुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो व व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 6.35 वाजता बंद केला. त्यानंतर मी घडलेली हकीकत साळुंके साहेबांना सांगितली. माझेवरील केलेल्या कारवाईची कागदपत्रे टपालामध्ये आहेत ती शिपुगडे यांचेकडे गेल्यानंतर पुढील पडताळणी कारवाई आयोजीत करूया असे साळुंके साहेबांनी सांगुन चालु पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगीत केली.

दिनांक 09/04/2025 रोजी जेसीबीचे मालक ओंकार पाटील हे माझेकडे त्यांचा जेसीबी सोडविण्याकरीता विनंती करू लागल्याने मी व ओकांर पाटील तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथे गेलो. तेथे तहसिलदार मॅडम यांची भेट

54



घेतली. त्यावेळी तहसिलदार मॅडम यांनी मला ते घटनास्थळास भेट देवुन, व परिस्थिती पाहुन पुढील नोटीस पाठवुन, रितसर कारवाई करणार असल्याचे सांगितले. सदरबाबत मी साळुंके साहेबांना सांगितले. त्यावेळी साळुंके साहेबांनी शिपुगडे भेटले अगर त्यांचेशी संपर्क झाला का याबाबत विचारणा केली असता, ते भेटले अगर त्यांचा संपर्क झाला नसल्याचे सांगितले. दिनांक 17/04/2025 रोजी तलाठी वळीवडेकर यांनी केलेल्या कारवाईमध्ये मा. तहसिलदार पन्हाळा यांनी निकाल देवुन माझे प्रकरण निकाली काढले व कारवाईमध्ये जप्त केलेला ओंकार पाटील यांचा जेसीबी सोडण्यात आलेला आहे. त्याबाबत मी साळुंके साहेबांना सांगितले.
गिरोलीचे तलाठी वळीवडेकर यांना माझेवर संशय आल्याने, ते माझेकडे स्वतः किंवा अन्य कोणाकडुन यापुर्वी माझेकडे मागणी केलेले 25000/-रू लाच रक्कम माझेकडुन स्विकारणार नाहीत याची मला खात्री झाली आहे. तरी आपलेकडून गिरोलीचे तलाठी वळीवडेकर यांचेविरुध्द योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे.
तरी माझे मौजे गिरोली, ता. पन्हाळा येथील शेतात बोअरवेलची गाडी जाणेकरीता रस्ता करण्याकरीता गायरानात ओमकार पाटील यांचे जेसीबीने खडी पसरवत असताना,मौजे गिरोली येथील तलाठी रमेश मुरलीधर वळीवडेकर रा. उजळाईवाडी ता.करवीर जि.कोल्हापूर यांनी परवानगी न घेता कसे काय काम करता असे म्हणुन जेसीबी ताब्यात घेवुन कारवाई केली होती. त्यानंतर मी तलाठी वळीवडेकर यांना भेटलो असता, त्यांनी कारवाई करायची नसेल व जेसीबी परत दयायचा असेल तर पैसे दयावे लागतील, असे म्हणुन माझेकडे अप्रामाणिकपणे व बेकायदेशीरपणे तडजोडीअंती त्यांचे स्वतःसाठी व त्यांचे वरीष्ठांचेसाठी 25,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे म्हणुन माझी रमेश मुरलीधर वळीवडेकर रा.उजळाईवाडी ता.करवीर जि.कोल्हापूर, तलाठी मौजे गिरोली सज्जा वाडीरत्नागिरी, ता. पन्हाळा याचेविरूध्द माझी फिर्याद आहे.
माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष — हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Kailas Jaywant kodag(I (Inspector)) / PNMAH52874 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार

**Signature of Officer-in`charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Kailas Jaywant koda
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH52874